# <u>मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर</u>

# जाहिरात

क्रमांक : एन – ९८६/एकेएस/आरए/२०१९ दिनांक : ०१/०८/२०१९

मुंबई उच्च न्यायालयाने, नागपूर खंडपीठ प्रशासनास शिपाई या पदाकरिता, प्रत्येकी ४० उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याची परवानगी दिली आहे. तथापि, या जाहीरातीद्वारे सध्या केवळ प्रत्येकी ३८ उमेदवारांची निवड यादी व ३८ उमेदवारांची प्रतीक्षा यादी अशी एकूण ७६ उमेदवरांची यादी तयार करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार सध्या सुदृढ, इच्छूक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदाची वेतन श्रेणी एस – १ : रू. १५००० – ४७६००/– व नियमानुसार देय भत्ते, अशी राहील. {उर्वरित ०२ जागा भरण्यासंबंधीचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयात दिव्यांगाच्या आरक्षणासंबंधी दाखल झालेल्या रिट याचिका (एल) क्रमांक ११३७/२०१८ आणि जनहित याचिका क्रमांक ७२/२०१८ (जनहित याचिका क्रमांक ४६/२०१८ औरंगाबाद खंडपीठ) मधील आदेशाच्या अधिन / अनुसरुन किंवा मुंबई उच्च न्यायालयाच्या भविष्यातील अधिसुचनेनुसार, जशी परिस्थिती असेल त्यानुसार, नजीकच्या काळात लगेचच भरण्यात येतील}

**<u>अ) पात्रता</u> :**

१. उमेदवार कमीत कमी ७ वा वर्ग पास असावा.

२. जाहीरात प्रसिद्धीच्या दिनांकास उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गियांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. न्यायालयीन व शासकीय कर्मचा–यांना कमाल वयोमर्यादेची अट लागू नाही.

३. शिपाई पदाला अनुषंगिक व दैनंदिन जीवनाला उपयुक्त अशी कला किंवा विशेष अर्हता/ प्राविण्य असणा–या उमेदवारांना प्राधान्य मिळू शकेल.

४. विशेष अर्हता प्राप्त उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी त्याबाबत पुरावा म्हणून आवश्यक ते दाखले/ अनुभव प्रमाणपत्र सादर करावेत. सदर अनुभव प्रमाणपत्रांवर संबंधित संस्थेचा/ संस्थाप्रमुखांचा शिक्का, सही व जावक क्रमांक असणे आवश्यक आहे. अशी अर्हता असल्याबाबत, खंडपीठ प्रशासनाकडून पडताळणी करून घेण्यात येईल.

५. जाहीरात प्रसिद्धीच्या दिनांकास अथवा त्यापूर्वी उमेदवारावर कोणत्याही फौजदारी न्यायालयाने एखाद्या खटल्यात शिक्षा ठोठावलेली नसावी. अथवा त्याचे विरूद्ध कोणतेही फौजदारी प्रकरण/ खटला प्रलंबित नसावा.

**ब) अर्ज भरण्याची पद्धत :**

१. अर्ज सादर करतांना दिलेल्या वेबसाईट (महाऑनलाईन) वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुनच अर्ज सादर करावा.

२. प्रस्तूत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

३. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php या संकेतस्थाळाद्वारे ००.०० वाजता दिनांक ०३/०८/२०१९ रोजी पासून ते दिनांक १७/०८/२०१९ रोजी २४.०० वाजेपर्यंत कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर सदर संकेंतस्थळावरून अर्ज भरण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल.

४. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करतांना उमेदवारांनी स्वत:चा अद्यावत पासपोर्ट फोटो (३.५ से. मि. X ४.५ सें.मि.) व स्वत:ची स्वाक्षरी (३ सें.मि. X २.५ सें. मि.), स्कॅन करुन ४० KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशी jpg / .jpeg format मध्ये, स्कॅन फाईल तयार करून, ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे. (<u>टिप</u> : फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेशपत्रावर/अर्जावर

दुस—याचा फोटो/ स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडप्रक्रियेत प्रवेश दिला जाणार नाही).

५. ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती, अचूकपणे भरणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी अर्ज सादर करतांना, जाहीरातीचे व दिलेल्या सूचनांचे वाचन करून, दिलेल्या संकेतस्थळावरील वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुनच अर्ज सादर करावा.

६. उमेदवाराने https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php *या वेबसाईट वर आपले खाते तयार केलेले नसल्यास उमेदवारास नविन वापरकर्ता नोंदणी वर क्लिक करुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.*

*७. त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मिती मध्ये जाउन स्वत:ची संपूर्ण माहिती भरावी लागेल. या वेबसाईटवर या पूर्वी प्रोफाईल निर्मिती मध्ये जाउन स्वत:ची संपूर्ण माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती भरावयाची आवश्यकता नाही. पण उमेदवार स्वत:च्या प्रोफाईल मधील जुनी माहिती अद्यावत करु शकतो / करावी.*

*८. उमेदवाराने युजर नेम व पासवर्ड ची नोंद लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालयाअंतर्गत उपलब्ध जाहिराती अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा या संदेशासह दाखविल्या जातील.*

*९. क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमुद शैक्षणिक पात्रता / अनुभव / इतर बाबींची पूर्तता करत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल. अन्यथा अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखवले जाईल.*

१०. परीक्षा प्रवेशपत्र उमेदवारास https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php *या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पदभरती संदर्भात सविस्तर माहिती, इतर शर्ती व*

*अटी हया* https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php *या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.*

*११. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.*

*१२. अनुभव प्रमाणपत्र ( मोघम नको ) संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे.*

१३. उमेदवार शासकीय / निमशासकीय कर्मचारी असल्यास त्याने आपल्या विभाग प्रमुखांचे/ सक्षम अधिका—याचे ना—हरकत प्रमाणपत्र, जाहीरातीच्या दिनांकाच्या नंतरच्या दिनांकाचे असावे, परंतु अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या नंतरचे नसावे. सदर मुळ प्रमाणपत्र, निवड समितीतर्फे जेव्हा मागवले जाईल, त्या त्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

*१४. निवडप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ६० दिवसांच्या कालावधीनंतर प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका नष्ट केल्या जातील.*

१५. सदरील अर्जाची Printout घेउन उमेदवारांनी स्वत:कडे जतन करून ठेवावे. मात्र निवड प्रक्रियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार, आवश्यक त्या—त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी. उमेदवाराने सदरील अर्जाची प्रत तसेच कोणतीही कागदपत्र पोस्टाने या कार्यालयात पाठविण्याची आवश्यकता नाही.

१६. उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याने/ तिने शेवटी केलेला अर्ज व भरलेली फी ग्राहय धरण्यात येईल. आधीच्या अर्जासोबत जर शुल्क भरणा केला असेल तर तो कोणत्याही परिस्थितीत परत केल्या जाणार नाही.

१७. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेल्या उमेदवारांनी, ते सदर पदासाठी पात्र असल्यास, विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करावा.

**उमेदवारांकरिता सुचना :—**

१. अर्ज शुल्क पे ऑन लाईन (Pay Online) वा चालानद्वारे वा महा इ सेवा केंद्र (CSC) भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

२. अर्जदाराने अर्ज करतांना शुल्क रुपये ५०/— भरावे आणि सदर शुल्क ना — परतावा राहील.

३. उमेदवाराने केवळ ना—परतावा शुल्क रू.५०/— भरले म्हणून त्यास लेखी/ चाचणी परिक्षेत बसण्याचा हक्क सांगता येणार नाही.

४. अल्पसूची यादी, उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php उपलब्ध राहील.

५. **उमेदवारांसाठी ऑनलाईन चालान शुल्क भरण्याची पध्दत :**

अ. स्क्रीनच्या डाव्याबाजूला वरती दिलेल्या 'my account' या टॅब वर क्लिक करावे.

ब. 'my account' या टॅब मधील 'my application' वर क्लिक करुन 'direct recruitment' वर क्लिक करावे.

क. ऑनलाईन पेमेंट करण्याकरीता खालील तिन ऑप्शनस् उपलब्ध आहेत.

१. Pay Online या अंतर्गत उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबॅकींग तसेच पे—टीमद्वारे शुल्क जमा करु शकतो.

२. Pay by challan ऑनलाईन चालान भरण्यासाठी 'Pay by challan' या बटणावर क्लिक करावे. 'Pay by challan' या बटणावर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने सदर चालानचे प्रिंट काढून ते भारतीय स्टेट बॅकेच्या कोणत्याही शाखेत भरावे. (बॅकेमार्फत त्याकरीता रुपये ५०/— शुल्क आकारले जाईल).

३. Pay at Maha e - Seva Kendra (CSC).

ड. ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या दोन तासानंतर उमेदवाराने वरील क. मधील १ ते ३ प्रकारे शुल्क जमा केले पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किंवा पुर्वी शुल्क जमा करणे आवश्यक आहे.

इ. ऑनलाईन प्रदान व्यवहार यशस्वी झाल्यावरच अर्जाचा स्वीकार होईल.

फ. ऑनलाईन शुल्क भरतांना सुरक्षेची जबाबदारी, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, प्रशासन विभाग, यांची राहणार नाही.

**६. अर्जदारांसाठी आवश्यक सूचना :—**

१. केवळ अर्ज दाखल केला यावरून कोणालाही परीक्षेचा/ मुलाखतीचा अथवा नेमणूकीचा हक्क असणार नाही.

२. शैक्षणिक अर्हता, विशेष अर्हता व गुणवत्तेच्या निकषावर पात्र उमेदवारांची अल्पसूची (short-listing) करण्याचे अधिकार उच्च न्यायालय प्रशासन स्वत:कडे राखून ठेवत आहे. ज्या उमेदवारांची नावे अल्पसूचीमध्ये आहेत अशांनाच पुढील प्रक्रियेकरिता बोलावले जाईल. सदरील पात्र उमेदवारांची अल्पसूची मुंबई उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल. परिक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र अर्जदाराने दिलेल्या e-mail address वरच पाठविण्यात येईल. अर्जदाराने प्रवेश प्रमाणपत्र मिळाल्या बद्दलची पोच देखील फक्त e-mail *द्वारेच दयायची आहे.*

३. *अर्जदाराने त्याचा अचुक* e-mail address *अर्जामध्ये भरायचा आहे. चुकीचा* e-mail address *दिल्यामुळे अर्जदारास प्रवेश प्रमाणपत्र न मिळाल्यास प्रशासन, उच्च न्यायालय त्यास जबाबदार राहणार नाही.*

**४.** अल्पसूचीतील उमेदवारांना सर्वप्रथम एक तासाची, बहुपर्यायी वस्तूनिष्ठ (मल्टीपल चॉईस) प्रश्न असलेली, लेखी परीक्षा (३० गुण) द्यावी लागेल. लेखी परीक्षेत पात्र ठरणा—या

उमेदवारांनाच पुढील क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी (१० गुण) साठी बोलावण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यानंतर मुलाखत (१० गुण) साठी बोलविण्यात येईल.

५. वरील सर्व परीक्षांसंदर्भातील सविस्तर माहितीसाठी व तत्सम बाबींसाठी उमेदवारांनी वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळास भेट द्यावी.

६. उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी मध्ये मिळविलेले गुण, त्याच्या अर्जाची छाननी केल्यानंतर व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच, अंतिमरित्या त्याची मुलाखतीसाठी पात्रता ठरविण्यात येईल. केवळ पात्र उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

७. लेखी परिक्षा/ क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी/ मुलाखत या परिक्षांच्यावेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणि पडताळणीसाठी ऑनलाईन अर्जाची प्रत व स्वत: चे आधार कार्ड/ पॅन कार्ड/वाहन परवाना, इ. ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

८. अल्पसूचितील उमेदवारांनी खालील दाखल्यांच्या/ प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती आणि सत्यप्रती आपल्याजवळ तयार ठेवाव्यात आणि सूचनेनुसार उपलब्ध कराव्यात.

अ. जन्मतारखेचा दाखला/ प्रमाणपत्र (उदा. शाळा किंवा महाविदयालय सोडल्याचा दाखला/ जन्म प्रमाणपत्र/एस. एस. सी. बोर्ड प्रमाणपत्र, इत्यादी)

आ. सक्षत अधिका–याने प्रदान केलेले अधिवास प्रमाणपत्र

इ. शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक (मार्क लिस्ट)/ प्रमाणपत्र (७ वी, १० वी, १२ वी, पदवी, इ.)

ई. जातीचा दाखला (मागासवर्गियांसाठी)

उ. विशेष अर्हता असल्याबाबतचा दाखला किंवा प्रमाणपत्र.

ऊ. पुर्वानुभव असल्यास त्यासंबंधीचा दाखला.

ए. लहान कुटूंबाबाबत प्रमाणपत्र (अर्जासोबत ऑनलाईन Form-A नमुन्यात)

ऐ. उमेदवार शासकीय / निमशासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना–हरकत प्रमाणपत्र.

ओ. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

औ. महिला उमेदवारांनी जर लग्नानंतर नावात बदल केला असल्यास, नाव बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र जसे की, शासन राजपत्र, सक्षम प्राधिका–याने प्रदान केलेले विवाह प्रमाणपत्र, इत्यादी.

अं. ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या दोन प्रतिष्ठीत व्यक्तींनी प्रदान केलेला, चांगली वर्तणूक/ चारित्रयाबाबतचा दाखला (संबंधित व्यक्तीचे नांव, पत्ता, हुद्दा व दूरध्वनी क्रमांका सह). सदर दाखला जाहीरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा. (अर्जासोबत ऑनलाईन Form-B नमुन्यात)

अः ज्याबाबत ऑन लाईन अर्जामध्ये माहिती दिली आहे, अशा इतर आवश्यक कागदपत्रांच्या मुळ प्रती व सत्य प्रती आपल्याजवळ तयार ठेवावेत आणि सूचनेनुसार उपलब्ध करुन द्यावेत.

९. पात्र उमेदवारांना निर्धारित तारखेस लेखी परीक्षा, क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी, व मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१०. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल झाल्यास अथवा काही तांत्रिक व खंडपीठ प्रशासनाच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे भरती प्रक्रिया रद्द झाल्यास, याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेच्या प्रकारात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे किंवा अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

– निवड प्रक्रियेचे वेळापत्रक, पद संख्या, स्थगिती, इत्यादी बाबत काही बदल असल्यास, ते उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केले जातील.

– तसेच सदरहू पदे जशी रिक्त होतील, त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

– निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापने बाबत/ स्थळाबाबत, स्वत: किंवा कोणाहीमार्फत, कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

११. लेखी परिक्षा, क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी/ मुलाखतीच्या निर्धारित तारखेस व वेळी, अधिसूचित बदल विलंबाने समजला, या कारणास्तव उमेदवार गैरहजर होता/राहिला, अशी तक्रार उमेदवारास करता येणार नाही.

१२. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर कोणत्याही पातळीवर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती, अपूर्ण किंवा खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती झाली असल्यास नेमणूक रद्द करण्यात येईल.

१३. अर्जदार जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे, असे समजून त्याला लेखी परिक्षा, क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी तसेच/ अथवा मुलाखती करिता, तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहीरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

१४. निवड प्रक्रियेसंदर्भात निवड समिती अथवा प्रशासनातील कोणत्याही अधिका–यावर, स्वत: किंवा/ तसेच इतर कोणाही मार्फत, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण–या उमेदवाराचा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच त्याचे विरूध्द नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. यासबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१५. निवड यादी व प्रतिक्षा यादी, जाहीर झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या

कालावधीसाठी वैध असेल. त्यानंतर, आदरणिय मुख्य न्यायाधीश, यांनी तो काळ वाढवला नाही, तर यादी विहीत मुदतीनंतर संपुष्टात येईल.

१६. सदर पदाचा परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षांचा आहे. परिविक्षा कालावधी दरम्यान किंवा/ तसेच परिविक्षा कालावधी यशस्वी रित्या पूर्ण होईपर्यंत, उमेदवाराची नियुक्ती, कोणतीही पूर्वसूचना/ कारण न देता समाप्त करता येईल.

१७. निवड/ प्रतिक्षा यादीतील उमेदवाराने नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत पदभार स्वीकारला नाही, तर त्याचे नाव निवड/ प्रतिक्षा यादीतून कमी करण्यात येईल.

१८. उमेदवाराची नियुक्ती, त्याने लेखी परिक्षा, क्रियाशीलता व स्वच्छता चाचणी/ तसेच मुलाखतीत मिळवलेल्या गुणांच्या गुंणवत्तेनुसारच करण्यात येईल.

१९. भरती प्रक्रियेसंबंधी निवड समितीचा निर्णय हा अंतिम राहील.

२०. सदर जाहीरात मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळ https://bombayhighcourt.nic.in/recruitment.php वर आणि मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर, कार्यालयाच्या सूचना फलकावरही उपलब्ध आहे. तसेच सेवा योजन कार्यालय, नागपूर यांना पाठविण्यात येईल व तेथील सुचना फलकावर सुध्दा उपलब्ध राहील.

**आदेशावरुन**

**प्रबंधक (प्रशासन)**
**मुंबई उच्च न्यायालय,**
**खंडपीठ नागपूर,**

**नागपूर**
**दिनांक ०१/०८/२०१९**

**नमूना 'अ'**
**प्रतिज्ञापत्र**

मी आवेदक/ अर्जदार ------------------------ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/ करते की / सांगतो/ सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही. तसेच माझेविरूद्ध कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा/ तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही.

(आवेदक/ अर्जदार राज्य/केंद्रशासन कर्मचारी असल्यास)

मी आवेदक/ अर्जदार ------------------------ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/ करते की / सांगतो/ सांगते की, माझे विरूद्ध कोणतीही शिस्तभंगाची चौकशी प्रलंबित नाही. किंवा/तसेच मला कोणत्याही शिस्तभंगाच्या चौकशीत दोषी ठरवण्यात आलेले नाही.

मी आवेदक/ अर्जदार ---------------------------- याद्वारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की / सांगतो/ सांगते की, मला आज दिनांक ------------ रोजी ----- अपत्ये आहेत. त्यापैकी ------ इतकी अपत्ये २८ मार्च, २००५ नंतर म्हणजेच दिनांक ----------- (त्या अपत्याची जन्मतारीख येथे नमूद करावी), रोजी जन्माला आले आहे.

२८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असल्यास, मी निवडप्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविला जाउ शकतो/ शकते, याची मला जाणीव आहे.

स्थान :-
दिनांक :-

आवेदकाचे नाव व सही

टिप :- आवेदक अविवाहीत असल्यास त्याने वरिल प्रतिज्ञापत्रात आवश्यक त्या ठिकाणी 'लागू नाही' असे नमूद करावे.

**नमूना 'ब'**
**चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी ———————————————— हे/हया ————————————, तालुका — ————————, जिल्हा ——————————, येथिल रहिवासी असून, मी त्यांना मागील —————— वर्षांपासून ओळखतो. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते/त्या माझे/माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरिल वर्तणूक/ चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे/ दिले आहे.

स्थान :—
दिनांक :—

प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव व सही
पत्ता :— ———————————
———————————
———————————
भ्रमणध्वनी क्रमांकः—